सत्यमेव जयते

# ग्राम विकास व पंचायतराज विभाग
# महाराष्ट्र शासन

# सर्व आवास योजना

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहिल्यानगर

सशक्त पंचायत सतत् विकास

# ग्रामीण गृहनिर्माण योजना



# केंद्र पुरस्कृत - प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण

- स्वरूप व लाभ – केंद्र शासनाने सन २०१६-१७ पासुन इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) केले. घरकुलासाठी रक्कम रु. १.२० लाख अनुदान देय PMFS प्रणालीव्दारे DBT योजने अंतर्गत वितरीत करण्यात येते. मनरेगा अंतर्गत ९०/९५ मनुष्यबळ मजुरी व स्वच्छ भारत अंतर्गत शौचालयासाठी रु. १२ हजार प्रोत्साहनपर अनुदान. घरकुलाचे बांधकाम कमीतकमी २६९ चौ.फु. असावे.

- पात्रता व निकष – लाभार्थी सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण, २०११ च्या सर्वेक्षणा नुसार घरकुलाच्या पात्र ब, ड यादीत असणे आवश्यक स्वमालकीची जागा असावी.

- निवड प्रक्रिया – प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण, २०११ च्या माहितीच्या आधारे प्रतिक्षा यादी तयार केली जाते.
- या प्रतिक्षा यादीनुसार पात्र लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या प्राधान्य क्रमानुसार घरकुलाचा लाभ दिला जातो.
- २०१८ मध्ये आवास प्लस सर्वेक्षण करण्यात आले.

# प्रधानमंत्री आवास योजना- (ग्रामीण)

## आवास प्लस सर्वे मध्यील पात्र लाभार्थी व प्राप्त उद्दिष्ट

- एकुण पात्र लाभार्थी - १४६५१८
- सन २०२१-२२ मध्ये लाभ - १६९९५
- सन २०२४-२५ मध्ये लाभ - ८३४३१
- सन २०२५-२६ प्राप्त उद्दिष्ट- ४६१०१

* हप्ता वितरण.- पहिला (अग्रिम)- १५०००/-, दुसरा (प्लिंथ लेव्हल) - ७००००/-,
तिसरा (लिंटल लेव्हल) - ३००००/- , चौथा (शौचालयासह पुर्ण) - ५०००/-

# गृहसंकुल - नांदगाव


- योजना- प्रधानमंत्री आवास योजना. लाभार्थी- 40
- भुमिहिन लाभार्थी - 40 गुंठे जागा पंडीत दिनदयाळ जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत जागा खरेदी.
- किचन ओटा, फरशी, विद्युतीकरण, स्वच्छता गृहासाठी टाईल्स इत्यादी सुविधा.




पुर्वी



नंतर



# गृहसंकुल - लोणी बु

- योजना- प्रधानमंत्री आवास योजना 54,
  रमाई-4,शबरी-2
  लाभार्थी - 60
- भुमिहिन लाभार्थी -60 गुंठे जागा जलसंपदा विभागाची जागा, विभागाची मंजुरी घेऊन प्रति लाभार्थी 500 चौ. फु. प्रमाणे भुखंड वाटप
- किचन ओटा, फरशी, विद्युतीकरण, स्वच्छता गृहासाठी टाईल्स इत्यादी सुविधा.

**योजनांचा कृतिसंगम**

- जल जीवन मिशन अंतर्गत पिण्याचे पाणी
- पंचायत समितीस मिळालेल्या बक्षीस रकमेतुन 50 लक्ष रक्कमेचे कॉक्रीट रस्ते
- भुमिगत गटार, पिण्याचे पाण्याची सुविधा
- वृक्षारोपण, रंगकाम, अंतर्गत लाईट फिटींग, स्ट्रीट लाईट

**पुर्वी**



**नंतर**



# गृहसंकुल - खारे कर्जुने

- योजना- शबरी आवास योजना. लाभार्थी- 60
- भुमिहिन लाभार्थी - 60 गुंठे जागा पंडीत दिनदयाळ जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत जागा खरेदी.

**योजनांचा कृतिसंगम**

- जल जीवन मिशन अंतर्गत पिण्याचे पाणी
- ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत रस्ते
- सेवाभावी संस्था सन फार्मा, ओरीएन्टल बँक, आय.डी.बी.आय.बँक, क्रॉम्पटन लि.
- वृक्षारोपण, अंतर्गत लाईट फिटींग, स्ट्रीट लाईट

**पुर्वी**



**नंतर**



# केंद्र पुरस्कृत - प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PMJANMAN)

* स्वरूप व लाभ – सदर योजना आदिवासी प्रवर्गातील अदिम, गौंड, कातकरी समाजासाठी आहे.

- सदरील योजना फक्त अकोले तालुक्यातील १० ग्रामपंचायती मध्ये लागु.
- घरकुलासाठी मंजुर अनुदान – २.०० लाख
- हप्ता वितरण.– पहिला (अग्रिम)– ९००००/–, दुसरा (लिंटल लेव्हल) – ९००००/– ,
  तिसरा (शौचालयासह पुर्ण) – २००००/–
- मनरेगा अंतर्गत ९०/९५ मनुष्यबळ मजुरी
- स्वच्छ भारत अंतर्गत शौचालयासाठी रु. १२ हजार प्रोत्साहनपर अनुदान.
- घरकुलाचे बांधकाम कमीतकमी २६९ चौ.फु. असावे

* पात्रता व निकष – लाभार्थी आदिवासी कातकरी समाजाचा असावा व स्वमालकीची जागा असावी.

* निवड प्रक्रिया – सन २०२४ मध्ये कातकरी समाजाचे ऑनलाईन सर्वेक्षण .

- एकुण ग्रामपंचायती –१०, सर्वेक्षण करण्यात आलेले लाभार्थी– ९५, सर्वेक्षण वेळी चुकीने पक्के घर – ८, अपात्र – ७, शिल्लक पात्र लाभार्थी – ८० , मंजुर – ७८, मंजुरी शिल्लक – २ (डुप्लिकेट जॉबकार्ड–१, रजिस्ट्रेशन साठी दिसत नाही–१)

# राज्य पुरस्कृत - रमाई आवास योजना ग्रामीण

- पात्रता व निकष – लाभार्थीचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य –१५ वर्षे
- अनुसुचित जाती व नवबौद्ध संवर्गातील असावा.
- लाभार्थी हा बेघर किंवा त्याचेकडे पक्के घर नसावे.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.२० लक्ष . स्वमालकीची जागा असावी.

- निवड प्रक्रिया – अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांचा प्रस्ताव ग्रामपंचायतमार्फत गट विकास अधिकारी यांना सादर करण्यात येतो, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण तथा सदस्य सचिव यांचे मार्फत मंजुरीची कार्यवाही.
- हप्ता वितरण.– पहिला (अग्रिम)– १५०००/–, दुसरा (प्लिंथ लेव्हल) – ४५०००/–,
  तिसरा (लिंटल लेव्हल) – ४००००/– , चौथा (शौचालयासह पुर्ण) – २००००/–

| क्षेत्र | घरकुल निर्माण समिती | पद |
|---|---|---|
| ग्रामीण | पालकमंत्री (संबंधित जिल्हाचे) | अध्यक्ष |
| | विधान सभा सदस्य संबंधित जिल्हा (अनुसूचित जातीचे) (**) | सदस्य |
| | मुख्य अधिकारी अधिकारी, जिल्हा परिषद, संबंधित जिल्हा | सदस्य |
| | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सार्वजनिक बांधकाम विभाग) | सदस्य |
| | सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग | सदस्य सचिव |

# शबरी आवास योजना ग्रामीण

- पात्रता व निकष - लाभार्थी हा महाराष्ट्र राज्यातील १५ वर्षे वास्तव्य रहिवाशी
- अनुसूचित जमातीचा असावा.
- लाभार्थी हा बेघर किंवा त्याचेकडे पक्के घर नसावे.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रु १.२० लक्ष असावे. स्वमालकीची जागा असावी.
- निवड प्रक्रिया - अनुसूचित जमातीच्य लाभार्थ्यांचा प्रस्ताव ग्रामपंचायतमार्फत गट विकास अधिकारी यांना सादर करण्यात येतो, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तथा सदस्य सचिव यांचे मार्फत मंजुरीची कार्यवाही.
- हप्ता वितरण.- पहिला (अग्रिम)- १५०००/-, दुसरा (प्लिंथ लेव्हल) - ४५०००/-, तिसरा (लिंटल लेव्हल) - ४००००/- , चौथा (शौचालयासह पुर्ण) - २००००/-

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- अध्यक्ष

२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा -सदस्य

३) कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, -सदस्य

४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प -सदस्य सचिव

# पारधी आवास योजना ग्रामीण

- निवड प्रक्रिया - लाभार्थी हा महाराष्ट्र राज्यातील १५ वर्षे वास्तव्य रहिवाशी
- पारधी समाजाचा असावा.
- लाभार्थी हा बेघर किंवा त्याचेकडे पक्के घर नसावे.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रु.१.२० लक्ष असावे.
- स्वमालकीची जागा असावी.
- आदिवासी पारधी समाजातील विधवा, निराधार व परित्यक्त्या स्त्रियांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल.
- पारधी आवास योजना सन २०१८-१९ पर्यंत सुरु होती तदनंतर पारधी समाजाला शबरी आवास योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो.
- हप्ता वितरण.- पहिला (अग्रिम)- १५०००/-, दुसरा (प्लिंथ लेव्हल) - ४५०००/-,

  तिसरा (लिंटल लेव्हल) - ४००००/- , चौथा (शौचालयासह पुर्ण) - २००००/-

# मोदी आवास योजना

- निवड प्रक्रिया - इतर मागास प्रवर्गातील असावा.
- आवास प्लस मधील प्रतिक्षा यादी नाव असलेले लाभार्थी
- आवास प्लस प्रणाली नोंद झालेले परंतु automatic system व्दारे reject झालेले पात्र लाभार्थी,
- जिल्हा निवड समितीने शिफारस केलेले लाभाथी या १, २, ३ मधून निवड करण्यात येईल.
- हप्ता वितरण.- पहिला (अग्रिम)- १५०००/-, दुसरा (प्लिंथ लेव्हल) - ४५०००/-,
  तिसरा (लिंटल लेव्हल) - ४००००/- , चौथा (शौचालयासह पुर्ण) - २००००/-

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ३. | उप अभियंता/ शाखा अभियंता, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ४. | इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी | सदस्य सचिव |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आवास योजना

- पात्रता निकष - सामाजीक न्याय व विशष सहाय्य विभागामार्फत सदर योजना राबविण्यात येते.
- लाभार्थी हा विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील असावा.
- निवड प्रक्रिया -१. आवास प्लस मधील प्रतिक्षा यादी नाव असलेले लाभार्थी, २. आवास प्लस प्रणाली नोंद झालेले परंतु automatic system व्दारे reject झालेले पात्र लाभार्थी, ३. जिल्हा निवड समितीने शिफारस केलेले लाभाथी या १,२,३ मधून निवड करण्यात येईल.
- हप्ता वितरण.- पहिला (अग्रिम)- १५०००/-, दुसरा (प्लिंथ लेव्हल) - ४५०००/-,

  तिसरा (लिंटल लेव्हल) - ४००००/- , चौथा (शौचालयासह पुर्ण) - २००००/-
- जिल्हा स्तरीय समिती
- १. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
- २. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद - सदस्य
- ३. प्रकलप संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा- सदस्य
- ४. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी यांचे प्रतिनिधी- सदस्य
- ५. सहाय्यक संचालक, नगर रचना - सदस्य
- ६. जिल्हा पशु संवर्धन अधिकारी - सदस्य
- ७. जिल्हा कृषि अधिक्षक - सदस्य
- ८. व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र - सदस्य
- ९. जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक वित्त व विकास महामंडळ - सदस्य
- १० जिल्हाधिाकरी यांनी नामनिर्देश्ति केलेला वि.जा.भ.ज. प्रवर्गासाठी कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता
- ११. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी - सदस्य सचिव

# अटल बांधकाम कामगार आवास योजना

* स्वरूप व लाभ – उदोग , उर्जा व कामगारा विभागाअंतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कलयाणकारी मंडळातर्फे सदर योजना राबविण्यात येते.

- घरकुलसाठी रक्कम रु. १.५० लाख अनुदान देय .
- मनरेगा अंतर्गत ९०/९५ मनुष्यबळ मजुरी व स्वच्छ भारत अंतर्गत शौचालयासाठी रु. १२ हजार पर अनुदान .
- घरकुलाचे बांधकाम कमीत कमी २६९ चौ.फु. असावे.

- पात्रता निकष – लाभार्थी हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कलयाणकारी मंडळाकडे सलक १ वर्षापेक्षा आधिक बांधकाम कामगार नोंदणीकृत असावा.
- तसेच तो महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.
- लाभार्थी हा बेघर किंवा त्यांचेकडे पक्के घर नसावे.
- लाभार्थी स्वमालकीची जागा असावी.
- लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात अन्यत्र कोठेही शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माणय / गृहकर्ज योजनांचा लाभ घेतलेला नसावा.
- लाभार्थी हा प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गतच्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमध्ये (PWL) समाविष्ट नसावा.
- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कलयाणकारी मंडळाकडे अर्ज करणे.
- प्राप्त अर्जांची छाननी करुन जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती तपासणी करुन लाभार्थी निवड करते.

| क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | अपर कामगार आयुक्त /कामगार उपायुक्त | अध्यक्ष |
| २ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ३ | जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य |
| ४ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य सचिव |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना

- इमाव, विजाभज, विमाप्र कल्याण विभागाअंतर्गत भटक्या जमाती -क प्रवर्गाती धनगर समाज बांधवासाठी सदर योजना राबविण्यात येते.
- निवड प्रक्रिया - अध्यक्ष -मा. जिल्हाधिकारी .
- सदस्य सचिव - सहाय्यक आयुक्त, इतर मागास व कल्याण विभाग.
- लाभार्थींनी अर्ज सहाय्यक आयुक्त, इतर मागास व कल्याण विभाग यांचेकडे सादरा करणे.
- मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रशासकिय मान्यता घेऊन निधी मागणी शासन स्तरावर करणे.
- घरकुलाची कार्यवाही ग्रामविकास विभागाच्या प्रचलित योजनांप्रमाणे.

# पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

निकष – लाभार्थी प्रतिक्षा यादीत समाविष्ट असावा अथवा घरकुल लाभास पात्र असावा.

- भुमिहीन असल्याचा दाखला,
- गावठाण हद्दीत जागा शिल्लक नसल्याचा दाखला.
- रक्तातील नात्यात व्यवहार नसावा.
- ५०० चौ.फु. जागेसाठी अनुदान वितरीत करण्यात येईल.

* अनुदान – दि. १४ जुलै २०१७ पासुन ५०,००० व सुधारीत ग्रामविकास विभाग शासन निर्णय ०६ फेब्रुवारी २०२४ पासुन रक्कम रु.१ लक्ष च्या मर्यादेत PFMS प्रणालीव्दारे DBT योजनेअंतर्गत वितरीत करण्यात येते.

- तालुकास्तरीय समिती.
- गट विकास अधिकारी – अध्यक्ष.
- नायब तहसिलदार – सदस्य
- उप अभियंता – सदस्य
- तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख – निमंत्रक
- उप निबंधक नोंदणी – निमंत्रक
- सिटी सर्वे ऑफिसर – निमंत्रक
- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय) – निमंत्रक
- विस्तार अधिकारी (समाज कल्याण ) – निमंत्रक
- विस्तार अधिकारी (पंयायत) – सदस्य सचिव

# संत सेवालाल महाराज बंजारा / लमाण तांडा समृध्दी योजना

- बंजारा/लमाण तांड्यांना स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देणे व तांड्यामध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करुन बंजारा समाजाला राजकीय प्रवाहात आणणे.
- पुनर्वसित गावाच्या धर्तीवर महसूली गावाचा दर्जा देणे, ग्रामपंचायत स्थापन करणे, पाणी, वीज, शाळा, अंगणवाड्या, आरोग्य, पथदिवे, गटारे, अंतर्गत रस्ते सुविधा निर्माण करणे.
- महाराष्ट्र राज्यात बंजारा/लमाण समाजाचे अनेक तांडे असुन, अशा तांड्यामध्ये बंजारा समाज अनेक वर्षापासून राहत असला तरी अशा बंजारा/लमाण तांड्यामध्ये प्राथमिक मुलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यासाठी बंजारा/लमाण तांड्याच्या विकासासाठी संत सेवालाल महाराज बंजारा / लमाण तांडा समृध्दी योजना राबविण्यात येत आहे.
- तांड्यांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे :- ग्राम विकास विभागाच्या दि. 12/02/2004 रोजीच्या शासन निर्णयानूसार सद्यस्थितीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी तांडा भागासाठी किमान 1000 इतकी लोकसंख्या व दोन गावातील 3 कि.मी. अंतर असणे आवश्यक आहे. बंजारा/लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या दोन गावातील 3 कि.मी.अंतराची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात येत अहे. ज्या तांड्यांची लोकसंख्या 1000 पेक्षा कमी आहे, अशा ठिकाणी एकापेक्षा जास्त तांडे एकत्र करून गृप ग्रामपंचायत स्थापन करण्यास तसेच ज्या तांड्यांची लोकसंख्या 1000 व त्यापेक्षा जास्त आहे व त्याच्या अजुबाजूला अणखी एक- दोन छोटे तांडे आहेत, तर अशा प्रकरणीही गृप ग्रामपंचायत स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी आवश्यक असणा-या बाबी जसे की, तांडा अधिकृतरित्या घोषित करणे, तांड्याना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देणे व सदर बाबीसाठी खालील प्रमाणे समिती -

- मुलभूत सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-
- प्रत्येक तांडयात सर्व आवश्यक मुलभूत सुविधेच्या उपलब्धतेसाठी Mapping करण्यात यावे व पुढील 3 वर्षात सर्व सुविधा प्रत्येक तांड्यात उपलब्ध होतील याबाबतचा कार्यक्रम आखून कार्यान्वित करण्यात यावा.

| | |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - अध्यक्ष |
| अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी | - सदस्य |
| कार्यकारी अभियंता (बांधकाम/पाणी पुरवठा) | - सदस्य |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी | - सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | - सदस्य |
| गट विकास अधिकारी | - सदस्य |
| समाजकल्याण अधिकारी | - सदस्य |
| विषयानुरुप विशेष निमंत्रित | - सदस्य |
| जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी नामनिर्देशित केलेले | - अशासकीय सदस्य |

बंजारा समाजाचे 2 प्रतिनिधी.

1. श्री. विष्णुपंत होनाजी पवार - माणिकदौंडी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर.

2. श्री. संजय राघू पवार - मा. सरपंच पत्र्याचा तांडा ता. पाथर्डी जि. अहमदनगर

प्रकल्प संचालक, एकात्मिक (जिल्हा ) ग्रामीण विकास यंत्रणा - सदस्य सचिव

## जिल्हास्तरीय समिती

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सह अध्यक्ष
3. उप विभागीय अधिकारी - सदस्य
4. तहसिलदार - सदस्य
5. तालुका निरिक्षक, भुमिअभिलेख - सदस्य
6. गट विकास अधिकारी - सदस्य
7. जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी नामनिर्देशित केलेले बंजारा समाजाचे 2 प्रतिनिधी - अशासकीय सदस्य
8. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) - सदस्य सचिव

## समितीच्या कार्यकक्षा

अ. बंजारा/लमाण तांडा घोषित करणे.

ब. गावठाण जाहिर करणे.

क. बंजारा/लमाण तांड्यांना महसूली गाव घोषित करणे.

ड. ग्रामपंचायत स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करणे व तांडयांसाठी ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या अनुषंगाने पुढिल योग्य ती कार्यवाही करणे. प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत दरमहा आढावा बैठक घेण्यात यावी.